**MHAH**160004652022

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १५४/२०२२ मधील निशाणी १२ खालील आदेश

१. प्रस्तुत मुळ अर्ज व्यथित व्यक्तीने सामनेवालाविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार न्यायप्रविष्ठ केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज नि. १२ हा सामनेवाला क्र. १ यांनी दाखल करुन विनंती केली आहे की, त्यांना अर्जाची समन्सची बजावणी झालेनंतर ते अर्जाकामी हजर झाले परंतु विहीत वेळेमध्ये कैफियत न दिलेने त्यांचेविरुध्द विनाकैफियत आदेश पारीत झाला आहे. सबब त्यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश बाजूला सारण्यात यावा आणि याकामी झालेला उशिर क्षमापित करावा.

३. याउलट व्यथित व्यक्तीचे वतीने प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवित म्हणणे देण्यात आले आहे की, प्रस्तुत अर्ज हा खोटा आणि बनावट आहे. सामनेवाला यांस समन्सची बजावणी झालेनंतर हजर होवूनही पुरेसा अवधी मिळुनही केवळ प्रकरण लांबणीवर टाकण्याकरिता जाणीवपुर्वक अर्जास कैफियत दिली नाही. सबब अर्ज नामंजुर करावा, यदाकदाचित अर्ज मंजुर करावा असे मत झाल्यास तो जबर खर्चासह मंजुर करावा.

४. मुळ अर्ज पाहिला. सामनेवाला यांनी न्यायप्रविष्ठ केलेला अर्ज अभ्यासला. प्रस्तुत मुळ अर्ज व्यथित व्यक्तीने सामनेवालाविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार न्यायप्रविष्ठ केला आहे. सामनेवाला यांस अर्जाचे समन्सची बजावणी झाली असून ते अर्जाकामी हजर

झाले आहेत परंतु विहीत वेळेमध्ये सामनेवाला यांनी कैफियत दिली नाही ही बाब खरी असली तरीही मुळ अर्जाचे स्वरुप लक्षात घेता अर्जाच्या योग्य त्या निर्गतीकरिता सामनेवाला यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल असणे गरजेचे आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचीत आहे. परंतु अर्जाकामी आणि म्हणणे देण्याकामी झालेला उशीर पाहता योग्य ती खर्चाची रक्कम सामनेवालावर लादणेही गरजेचे आहे. परिणामी खालील आदेश –

## आदेश

१. अर्ज नि. १२, सामनेवाला क्र. १ यांनी खर्चाची रक्कम रुपये ४००/– भरण्याच्या अटीच्या अधीन मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ विरुध्द झालेला विनाम्हणणे आदेश बाजूला सारण्यात येतो आणि म्हणणे देण्याकामी झालेला उशिर क्षमापित करण्यात येतो.

३. सामनेवाला यांनी खर्चाची रक्कम रुपये ४००/– ची पुर्तता केलेनंतर ती अर्जदारास देण्यात यावी.

SHWETA ABHIJIT PARWATKAR
Digitally signed by SHWETA ABHIJIT PARWATKAR
Date: 2024.03.14 17:24:15 +0530

दिनांक १४.०३.२०२४ ( एस.अे.पर्वतकर )

अकोले न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले.